या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार ६ जून २०२४ | अंक१७९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# देवेंद्र फडणवीस यांनी आता कोणालाही अंगावर घालू नये.

## लोकसभेला जसा इंगा दाखविला तसा विधानसभेला दाखवेन,मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना दिला इशारा

### मराठा फॅक्टरचा दणका

मराठा आरक्षणासाठी गेल्या वर्षीच्या मध्यात मोठी घाडमोड घडली. मराठा आरक्षणासाठी मोठे आंदोलन उभारण्यात आले. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागे महाराष्ट्रातील मराठा समाज उभा राहिला. जालना जिल्हा राज्याच्या केंद्रस्थानी आला होता. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्य सरकारच्या भूमिकेविषयी जरांगे पाटील यांनी कायम साशंकता व्यक्त केली. त्याचा फटका राज्यात अनेक लोकसभा मतदारसंघात दिसून आला. मराठवाड्यात पण या फॅक्टरच्या माध्यमातून मराठा समाजाने त्यांची नाराजी दाखवून दिली.



लोकसभा निकालात महाराष्ट्राने भाजपच्या मनसुब्यावर मोठे पाणी फेरले. यामध्ये मराठा फॅक्टर अनेक मतदारसंघात प्रभावी दिसला. भाजपच्या काही दिग्गजांना मराठा फॅक्टराचा थेट परिणाम दिसला. अनेक मतदारसंघात मराठा आरक्षणाच्या मुद्यामुळे दुखावलेल्या समाजाने मतपत्रिकेतून नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले. आता लोकसभा निकालानंतर मनोज जरांगे पाटील हे पुन्हा आक्रमक झाले आहेत. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. त्यांनी मराठा फॅक्टरची अप्रत्यक्ष आठवण करुन देत असा इशारा दिला. सरकारने आता तरी जागे व्हावे मी राजकारणी नाही, निवडणूक जिंकल्यानंतर बीडचे खासदार बजरंग सोनावणे हे सहज भेटायला आले होते. सरकार मराठ्यांना भित नव्हते. या निवडणुकीत मराठा समाजाने एकवटून दाखवून दिले.आता तरी सरकारने जागे व्हावे, आणि आरक्षण देण्याबाबत निर्णय घ्यावा असे आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. निवडणुकीत मी कोणालाही पाडा म्हटलो नव्हतो. लोकांनी स्वतः हून ही निवडणूक हातात घेतली होती, असा दावा त्यांनी केला. मराठा आंदोलनावेळी मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात आरोपांची राळ उडवली होती. फडणवीस यांच्यावर त्यांचा रोष वेळोवेळी व्यक्त होत होता. फडणवीस ओबीसी नेत्यांच्या अडून राज्यात समाजा-समाजाता द्वेष पसरवत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. आता त्यांनी फडणवीस यांच्यावर पुन्हा हल्लाबोल केला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आता कोणालाही अंगावर घालू नये. लोकसभेला जसा इंगा दाखविला तसा विधानसभेला दाखवेन,असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना दिला. आरक्षण दिले नाहीं तर राज्यातील 288 विधानसभा जागांवर निवडणूक लढविणार असल्याचे ते म्हणाले.



# महाराष्ट्राचा दिवाळी दसरा: शिवराज्याभिषेक सोहळा!

## कविता

### आज शिवराज्याभिषेक दिनानिमित्त

छत्रपती शिवाजी महाराजांची महती
सांगावी किती ?
मित्रा, रायगडावर दरवर्षी मावळे मोजू
किती

मनात भिनली जिजाऊ मातेची अंगाई
होते आशिर्वाद तुळजा भवानी माताई
केले सोहळ्याच्या वर्षीच स्वराज्याची
प्रतिज्ञाई
जिजाऊ मातेची मिळे शाबासकी
पावती किती ?
छत्रपती शिवाजी .....

लाभले शूरवीर पराक्रमी सरदार
होते खजिनांचे ईमानदार
असत आया- बहिणींचे रक्षणदार
स्वराज्यात शत्रूंना वाटे भिती
छत्रपती शिवाजी.....
छत्रपती ना करित पुजा
ते अंधश्रद्धेला करित दुजा
करित रयतेच्या हृदयाची पुजा
दिली शत्रूलाहि माणुसकी किती ?
छत्रपती शिवाजी......

तलवार होती बिजली
शेतात बियाणे भिजली
रयता सन्मानाने झिजली
गनिमी कावाचे मुहूर्त यशस्वी पाहिले
किती ?
छत्रपती शिवाजी.....
जसा गुन्हा तशी शिक्षा
घेतली विरोधकांनी सावध दिक्षा
आपलेच मागत होते लोभांची भिक्षा
आपल्या सैन्यात विश्वासू मुसलमान
होते किती ?
छत्रपती शिवाजी......

करित उत्तम न्यायनिती
आणली समाज परिवर्तनात गती
असे नियोजन वेळेवरती
तेंव्हाच्या महाराष्ट्रात असे समाधानी
सर्वधर्म जाती
छत्रपती शिवाजी..

आज महाराष्ट्रातील सर्व जातीच्या-
धर्माच्या मावळ्यांना आणि तमाम
शूरवीर महिलांना शिवराज्याभिषेक च्या
३५०वा दिनानिमित्त हार्दिक हार्दिक
भगवामय शुभेच्छाऽऽऽ !

जय जिजाऊ- जय शिवराय !

जय महाराष्ट्र !!

~@ शब्दमहर्षी विलास देवळेकर
कार्यालय प्रमुख
कौटिल्य भवन- बी. के.
सी. मुंबई,
आयकर विभाग स्थानीय लोकाधिकार
समिती
आयकर भवन- मुंबई

□□□□□□□□□□□□

---

(शिवराज्याभिषेक सोहळा दिवस.) रायगडावर दि.६ जून १६७४ रोजी झालेला शिवराज्याभिषेक सोहळा हा त्या गडावर आलेल्या प्रत्येकासाठी जणू दसरा-दिवाळी उत्सवासारखाच होता. आपल्या लाडक्या राजाला सिंहासनावर बसलेला पाहण्यासाठी असंख्य जनता आसुसून तेथे उपस्थित होती. हा सोहळा ज्यांनी “याचि देही, याचि डोळा” अनुभवला त्या प्रत्येकाच्या मनात आपण धन्य झालो, ही एकच भावना होती. या सोहळ्यात अशा काही खास गोष्टी करण्यात आल्या, ज्या केवळ ऐकून तुमच्या अंगावर रोमांच उभा राहिल्याखेरीज राहणारच नाही. ज्या ऐकून तुम्हाला कदाचित तुमच्या डोळ्यासमोर या शिवराज्याभिषेक सोहळ्याची हलकीशी छटा सुद्धा निर्माण होईल, चित्रफितीसारखी! अशा या नयनरम्य सोहळ्याचे सुंदर शब्दचित्रण श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखात बघा... संपादक.

रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी कित्येक महिन्यांपासून सुरु होती. या सोहळ्याच्या नऊ दिवस आधी या राज्याभिषेकाशी संबंधित अनेक विधी पार पडले. दि.६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, राज्याभिषेक सुरु झाला. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणि वस्त्रे भेट देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. गळ्यात फुलांच्या माळा इकडून तिकडे व तिकडून इकडे रूळत होत्या. राज्याभिषेकात महाराजांचे अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे, हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब व दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचकावर छत्रपती शिवाजी महाराज बसले, शेजारी रेशमी उपरण्याला भरजरी साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचकावर, तर बाल शंभूराजे नटूनथटून थोडेसे मागे बसले होते. अष्टप्रधान मंडळातील आठही प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर त्या जलकुंभांनी छ.शिवाजी महाराजांवर अभिषेक झाला. त्यावेळी मंत्रोच्चारण आणि आसमंतात विविध मंगल सुरवाद्य निनादत होते. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर छ.शिवाजी महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक रुबाबदार राजमुकूट घातला. आपली ढालतलवार आणि धनुष्यबाण यांची पूजा केली.



या शुभ मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात रुबाबात प्रवेश केला.

राज्यभिषेकाचे दालन हिंदू परंपरेनुसार ३२ शुभशकुन चिन्हांनी सजवलेले होते. सभासदबखर म्हणते त्याप्रमाणे ३२ मण सोन्याचे भव्य सिंहासन सोन्याच्या पत्र्याने मढवलेले होते. छत्रपती शिवाजीराजे सिंहासनावर दिमाखात आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. प्रजेनी महाराजांना शुभाशीर्वाद दिला. “छत्रपती शिवाजी महाराज की जय! छत्रपती शिवाजी महाराज की जय!!” असा जयघोष करण्यात आला. सोन्याचांदींची फुले उधळली गेली. विविध- ढोल, नगारे, तुतारी, सनई आदी तालवाद्यांच्या निनादाने व सूरवाद्यांच्या मंगलसुरांनी आसमंत दुमदुमून गेले. आधीच ठरविल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून “धडाक धूम...” तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्यांची झालर ठेवत “शिवछत्रपती” म्हणून उच्चार केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जनांना खुप धनधान्य भेट म्हणून दिले. त्यांनी एकून सोळा प्रकारचे महादान केले. त्यानंतर विविध मंत्रिगणांनी सिंहासनापुढे जाऊन राजांना अभिवादन केले. शिवछत्रपतींनी त्यांना या प्रसंगी विविध पदे, नियुक्तिपत्रे, धन, घोडे, हत्ती, रत्ने, वस्त्रे, शस्त्रे दान केलीत. हे सर्व सकाळी आठ वाजेपर्यंत संपले. समारंभ संपल्यावर छत्रपती शिवाजी महाराज पहिल्यांदाच एका देखण्या घोड्यावर स्वार होऊन जगदीश्वराच्या मंदिराकडे गेले. तिकडून हत्तीवर स्वार होऊन त्यांची मिरवणूक रायगडावर निघाली. इतर दोन हत्तींवर जरीपटके आणि भगवे झेंडे घेऊन सैन्यांचे प्रतिनिधी होते. सोबत अष्टप्रधान मंडळ आणि इतर सैन्यदळ होते. रायगडावर ही मिरवणूक जात असताना सामान्य जनांनी फुले, चुरमुरे उधळले; दिवे ओवाळले. रायगडावरील विविध मंदिरांचे दर्शन घेऊन राजे महालात परतले.

राज्याभिषेकाच्या दिवसापासूनच स्वराज्यातील राजपत्रांवर “क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती” असे नमूद करणे सुरु झाले. शिवरायांनी राज्याभिषेकाच्या दिवसापासून नवीन शक सुरु केले आणि छत्रपती शिवराय शककर्ते राजे झाले. याच शकाला शिवराज्याभिषेक शक संबोधले जाते. शिवरायांनी आपल्या स्वतःच्या स्वराज्यात स्वतःच्या नावाची नाणी पाडली. तांब्याच्या पैश्याला- शिवराई व सोन्याच्या पैश्याला- शिवराई होन म्हटले जाऊ लागले. स्वराज्यात अधिकृतरीत्या शिवरायांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली. अनेक सरदार व मंत्री यांना स्वराज्याची कामे आणि जबाबदाऱ्या वाटून दिल्या. रायगडावर दि.६ जून १६७४ रोजी झालेला शिवराज्याभिषेक सोहळा हा त्या गडावर आलेल्या प्रत्येकासाठी जणू दसरा-दिवाळी उत्सवासारखाच होता. आपल्या लाडक्या राजाला सिंहासनावर बसलेला पाहण्यासाठी असंख्य जनता आसुसून तेथे उपस्थित होती. हा सोहळा ज्यांनी “याचि देही, याचि डोळा” अनुभवला त्या प्रत्येकाच्या मनात आपण धन्य झालो, ही एकच भावना होती. या सोहळ्यात अशा काही खास गोष्टी करण्यात आल्या, ज्या केवळ ऐकून तुमच्या अंगावर रोमांच उभा राहिल्याखेरीज राहणारच नाही. ज्या ऐकून तुम्हाला कदाचित तुमच्या डोळ्यासमोर या शिवराज्याभिषेक सोहळ्याची हलकीशी छटा सुद्धा निर्माण होईल, चित्रफितीसारखी! !! शिवछत्रपती शिवाजी महाराज की जय !! अतिव ओढ असणाऱ्या अतिव गोड अशा या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

-

**संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

# पिपळा धायगुडा येथे बजरंग बप्पा सोनवणे यांचा विजयाचा जल्लोष



अंबाजोगाई पिपळा धा, येथे बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे कार्यकर्त्याकडून जल्लोष करण्यात आला. तसेच पिपळा धायगुडा गावात फटाके व आतिषबाजी करून गुलाल उधळून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी कुंडलीक आप्पा धायगुडे सुंदर धायगुडे प्रकाश शिंके मनोहर धायगुडे अरूण गरड व गावकरी कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.




जि प शाळा जिवाला तांडा ता .गेवराई व पालवण ता बीड येथे 5 जुन जागतिक पर्यावरण दिननिमित्त कार्यक्रम घेऊन जनजागृती केली. मा विभागीय वनाधिकारी बीड श्री गर्कल साहेब यांचे मार्गर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी बीड ए एन काकडे,वन पाल गेवराई टाकनखार, वनरक्षक गाडे व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# सोलापुर लढतीवर मनसे आणि शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यात एक लाखांची पैज, कोणी जिंकली ?

लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रामधील निकालाकडे सर्वांचं लक्ष लागलेलं होतं. महायुती आणि महाविकास आघाडीने आपली सर्व ताकद लावली खरी पण महायुतीचा धक्कादायक निकाल पाहायला मिळाला. शरद पवार गट, ठाकरे गट आणि काँग्रेसने कमाल करून दाखवली. एक्झिट पोल फोल ठरवत लोकसभेच्या ३० जागांवर गुलाल उधळला. शिवसेना आणि राष्ट्रवादीसारखे दोन मोठे पक्ष फुटल्यामुळे महायुतीची ताकद दिसून येत होती. मात्र मविआने निकाल फिरवून दाखवला. राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष फुटल्यामुळे ग्रामीण भागांसह अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांची गोची झाली होती. अनेक ठिकाणी घराघरांमध्ये फूट पडल्याचं दिसून आलं. काही ठिकाणी पैज लावल्या गेल्या होत्या, अशाच प्रकारे सोलापूर लोकसभा मतदार संघामध्ये एक लाखांची पैज लावली गेली होती. सोलापूरमध्ये ही पैज शरद पवार गट आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये लावलेली होती. सोलापूरमध्ये काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे तर भाजपकडून राम सातपुते यांच्यात लढत होती. यामध्ये प्रणिती शिंदे यांनी विजय मिळवला. मग एक लाखांची पैज कोण जिंकलं?



मनसे नेते प्रशांत इंगळे आणि शरद पवार गटाचे नेते प्रशांत बाबर यांच्यात

हा पैज लागली होती. सोलापूर लोकसभेत राम सातपुते जिंकणार असा दावा प्रशांत इंगळे यांनी केला होता. तर काँग्रेसच्या प्रणिती शिंदे जिंकणार असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रशांत बाबर केला होता. लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या प्रणिती शिंदे निवडणुक जिंकल्यामुळे प्रशांत इंगळे पैज हरले होते. त्यानंतर मनसे पदाधिकाऱ्याने शरद पवार गटाला 1 लाखाचा चेक दिला. मात्र मनसेच्या प्रशांत इंगळे यांनी दिलेले 1 लाख रुपये राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रशांत बाबर यांनी न स्विकारता विद्यार्थ्यांसाठी साहित्य वाटपासाठी परत केले. प्रणिती शिंदे सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या पहिल्या महिला खासदार आहेत. प्रणिती शिंदे या सोलापूर लोकसभेच्या पहिल्या महिला खासदार ठरल्या आहेत. प्रणिती शिंदे यांचा 74, 814 मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे. काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना ईव्हीएममध्ये 74197 मते तर पोस्टल मध्ये 617 मतांची आघाडी होती. तर प्रणिती शिंदे यांना एकूण 6,20,225 मते, भाजपच्या राम सातपुते यांना 5,46,028 मते मिळाली आहेत. पोस्टल मतदानात प्रणिती शिंदे यांना 617 मते मिळाली आहेत.

## कोरोना काळात अनेकांना वाचवलं, आता थेट संसदेत, कोण आहेत निलेश लंके?

लोकसभा निडणूक 2024 चे निकाल समोर आले असून अनेक ठिकाणी धक्कादायक निकाल लागल आहेत. अनेक निकालांची चर्चा झाली, त्यापैकीच एक निकाल होता अहमदनगरमधील पवार गटाचे उमेदवार निलेश लंके यांचा. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुजय विखे-पाटील यांना २८ हजार मतांनी हरवत लंके यांनी विजय संपादन केला. विद्यमान खासदाराला हरवून शरद पवार गटाचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यंनी विजयश्री खेचून आणली. कोरोनाकाळात निलेश लंके यांनी केलेल्या कामाचा त्यांना या निवडणुकीमध्ये फायदा झालेला दिसला. आता ते थेट संसदेत अहमदनगरचे प्रतिनिधित्व करताना दिसतील. ऐन निवडणुकीच्या तोंडावर निलेश लंके यांनी राष्ट्रवादी अजित पवार गट सोडून शरद पवार गटात प्रवेश केल्याने ते बरेच चर्चेत आले होते. त्यामुळे अजित पवार गटाला मोठा धक्का बसला. मात्र शरद पवार गटात आल्यावर त्यांच्यावर विश्वास दाखवण्यात आला आणि अमहदनगरमधून त्यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत लंके यांना 6 लाख 24 हजार 707 इतकी मतं मिळाली. तर भाजपच्या सुजय विखे पाटील यांच्या पारड्यात 5 लाख 95 हजार868 मतं पडली.

## महाराष्ट्रातील जनतेला उष्णतेपासून लवकरच दिलासा, या दिवशी होणार पावसाचं आगमन

**मुंबई प्रतिनिधी**

मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या उन्हाचा तडाखा जाणवत आहे. त्यामुळे प्रत्येकाला पावसाची प्रतिक्षा आहे. मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. त्यामुळे लवकरच तो महाराष्ट्रात दाखल होणार आहे. हवामान खात्याने (IMD) मान्सूनबाबत दिलेल्या अपडेटनुसार महाराष्ट्रातील जनतेला उष्णतेपासून लवकरच दिलासा मिळू शकतो. नैऋत्य मान्सून ३० मे रोजी निर्धारित वेळेआधीच केरळमध्ये पोहोचलाय. केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये मान्सून दाखल झाला आहे. हवामान खात्याने (IMD) म्हटले आहे की मान्सून लवकरच इतर राज्यांमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. मुंबईत प्री मान्सून पावसाची शक्यता IMD नुसार, मुंबईसह



महाराष्ट्रात 10 जूनपर्यंत मान्सून दाखल होऊ शकतो. मुंबईत लवकरच मान्सूनपूर्व पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, मुंबईत 6 जून ते 10 जून दरम्यान मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# जनतेने झुगारले ईडीचे आरोप; ईडी आणि सीबीआयचे कथित आरोपी पोहोचले संसदेत



लोकसभा निवडणुकांची घोषणा होण्यापूर्वी म्हणजे साधारण वर्षभरापासून देशभरातील नेत्यांवर दोन एजन्सींच्या धाडी पडत होत्या. विशेष म्हणजे हे सर्व नेते भाजप विरोधातील नेते होते. ज्यांनी त्या एजन्सींच्या कारवाईला घाबरून भाजप पक्षात प्रवेश केला त्यांच्या कारवाया थांबल्या. या दोन एजन्सी म्हणजे अंमलबजावणी संचालनालय ( ईडी ) आणि सीबीआय. मात्र, ज्यांनी विरोध केला त्यांच्यावर अटकेची कारवाई झाली. तुरुंगवास झाला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत ही त्याची काही ठळक उदाहरणे. ईडीच्या चौकशीला, कारवाईला घाबरून अनेकांनी भाजपासमोर समर्पण केले. तर काही जण निर्भीडपणे त्याला समोर गेले. लोकसभा निवडणूक जाहीर झाली. त्यानंतरही काही नेत्यांमागे ईडीच्या चौकशीचा फेरा सुरूच होता. मात्र, त्या नेत्यांनी लोकसभा निवडणूक लढविली. इतकेच नव्हे तर त्यांची ईडी चौकशी सुरु असतानाही जनतेने त्यांना भरभरून मते देत विजयी करुन लोकसभेत पाठविले. कोण आहेत ते विजयी खासदार चला जाणून घेऊ... ममता बॅनर्जी यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी सात लाख मतांनी विजयी टीएमसी प्रमुख, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे पुतणे आणि पक्षाचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांची ईडी चौकशी झाली आहे. पश्चिम बंगालमधील कथित शालेय नोकऱ्यांच्या घोटाळ्याप्रकरणी त्यांची ईडीने जवळपास नऊ तास चौकशी केली होती. अभिषेक बॅनर्जी यांनी डायमंड हार्बर मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. या निवडणुकीत अभिषेक यांनी भाजप उमेदवार अभिजित दास यांचा सात लाखांहून अधिक मतांनी पराभव केला. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत 6,82,502 मतांच्या फरकाने विजयी झालेल्या CPI (M) चे माजी खासदार अनिल बसू यांचा 20 वर्षांचा विक्रम अभिषेक यांनी मोडला.

## प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीच्या किती जागा पाडल्या? ; राज्यभरात किती मते मिळाली?

प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीला फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, प्रत्यक्षात वंचित आघाडीचा महाविकास आघाडीला फारसा फटका बसलेला दिसत नाहीये. मागच्यावेळी वंचित आघाडीमुळे काँग्रेस-राष्ट्रवादीला 8 जागांवर नुकसान सोसावं लागलं होतं. यावेळीही महाविकासला किमान तीन जागांवर फटका बसला आहे. तर गेल्यावेळीच्या तुलनेत यंदा वंचितला अत्यंत कमी मते मिळाल्याचं दिसून येत आहे. म्हणजेच वंचितला जनतेने साफ नाकारल्याचं आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. आघाडीला चार जागांवर फटका वंचितमुळे महाविकास आघाडीच्या चार जागा पडल्या आहेत. अकोला, बुलढाणा, हाकणंगले आणि वायव्य मुंबईत वंचितमुळे महाविकास आघाडीला फटका बसल्याचं दिसत आहे. अकोल्यात प्रकाश आंबेडकर स्वत: उभे होते. या ठिकाणी तिरंगी लढत झाली. या निवडणुकीत आंबेडकर यांना 2,76,747 मते मिळाली. या निवडणुकीत काँग्रेसचे अभय पाटील अवघ्या 40,626 मताने पडले. या ठिकाणी आंबेडकर महाविकास आघाडीकडून उभे असते तर जिंकून आले असते. किंवा आंबेडकरांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला असता तर काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला असता. बुलढाण्यातही ठाकरे गटाचे नरेंद्र खेडेकर पडले. त्यांचा 29 हजार 479 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी वंचितच्या वसंतराव मगर यांनी 98 हजार 441 मते घेतली. ही मते खेडेकर यांच्या पारड्यात गेली असती तर त्यांचा विजय निश्चित झाला असता. हातकणंगलेमध्ये ठाकरे गटाचे उमेदवार सत्यजीत पाटील यांचा अवघ्या 13 हजार 426 मतांनी पराभव झाला. या ठिकाणी वंचितचे उमेदवार डीसी पाटील उभे होते. डीसी पाटील यांना 32 हजार 696 मते मिळाली. त्याचा ठाकरे गटाच्या उमेदवाराला फटका बसला. वायव्य मुंबईत ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांचा अवघ्या 48 मतांनी पराभव झाला. या मतदारसंघात वंचितचे उमेदवार परमेश्वर रणशूर यांनी 10 हजार 52 मते घेतली. त्यामुळे ठाकरे गटाला फटका बसल्याचं दिसून आलं आहे.

## मराठा आरक्षणासाठी तरुण अरुण राजेन्द्र सुरवसे यांची आत्महत्या



बीड (प्रतिनिधी) - बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील तरुण अरुण राजेन्द्र सुरवसे वय ३६ वर्षे या युवकाने मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केली आहे.आरक्षण मिळत नसल्याने अतिशय तुटपुंजी शेती, उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही अशा परिस्थितीत दोन मुलांचे शिक्षण कसे करावे? असे वारंवार बोलत होते.आरक्षण नसल्यामुळे आपलेही आयुष्य बरबाद झाले आणि आता आपण मुलांना नीट शिकवू शकत नाहीत.अशी काळजी त्यांच्या मनात होती.या अतिशय दुर्दैवी घटनेनंतर पत्नी व दोन मुले उघड्यावर पडले आहेत. पंचक्रोशीत अतिशय हळहळ व्यक्त केली जात आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
गुरुवार ६ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# भाजपला फोडाफोडीची धडकी, तातडीने देशभरातील २४१ खासदारांना दिल्लीत बोलवलं

**बीड /प्रतिनिधि**

आपण जे पेरतो तेच उगवतं, असं म्हणतात. ही दुनिया गोल आणि खूप लहान आहे. माणूस फिरून त्याच ठिकाणी येतो, असं आपण बऱ्याचदा ऐकलं असेल. देशातील सर्वात मोठ्या भाजप पक्षाला अशाच काही गोष्टींमधून सामोरं जावं लागत आहे. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षांना खिंडार पाडलं. देशभरातील विविध राज्यांमध्ये ऑपरेशन लोटस राबवत पक्ष फोडले, सत्तांतर घडवून आणलं किंवा तशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला, आणि आता भाजपलाच केंद्रात आपल्या अस्तित्वाचं सरकार आणण्यासाठी झुंजावं लागत आहे. विशेष म्हणजे आपले खासदार फुटू नयेत यासाठी आता भाजपकडून विशेष काळजी घेतली जात आहे. त्यामुळे भाजपला फोडाफोडीच्या राजकारणाची धडकी भरल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाजपने देशातील सगळे 241 खासदार दिल्लीत बोलावले आहेत. इंडिया आघाडीच्या हालचालीनंतर भाजप पक्ष सतर्क झाला आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून भाजपने उद्या सर्व 241 खासदारांना दिल्लीत बोलवलं आहे. एनडीए आघाडी येत्या 7 तारखेला सत्ता स्थापनेचा दावा करणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एनडीएच्या खासदारांना संध्याकाळी 7 तारखेला संध्याकाळी



5 ते 7 वाजेची वेळ दिली आहे. यावेळी एनडीएचे नेते सत्ता स्थापनेचा दावा करणार आहेत. पण त्याआधी कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी भाजपकडून विशेष काळजी घेतली जात आहे.

एनडीएच्या आजच्या बैठकीत काय घडलं?एनडीएची आज दिल्लीत अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाकडून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे उपस्थित होते. तसेच एनडीएच्या घटकपक्षाचे सर्व महत्त्वाचे नेते उपस्थित होते. या बैठकीत नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन करण्यात आलं. तसेच नरेंद्र मोदी यांचं नाव पुन्हा पंतप्रधान पदासाठी निश्चित करण्यात आलं. सर्वांनी नरेंद्र मोदी यांच्या नावाला समर्थन दिलं. शक्य तितक्या लवकर सरकार स्थापन करा, असं बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार बैठकीत म्हणाले. तसेच आम्ही तुमच्यासोबत आहोत, असं आश्वासन नितीश कुमार यांनी दिलं. एनडीएच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही बोलावलं दिल्लीतदरम्यान, भाजप नेतृत्वाकडून एनडीएतील घटक पक्षांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना उद्या दिल्लीत बोलावण्यात आलं आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना उद्या रात्रीपर्यंत दिल्लीत दाखल होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. येत्या 7 तारखेला भाजप नेतृत्वासोबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक होणार आहे. केंद्रात नव्या सरकारच्या स्थापनेपूर्वी भाजप नेतृत्व मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत संवाद साधणार आहे. या बैठकीत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना काय सांगितलं जातं ते पाहणं देखील महत्त्वाचं असणार आहे.

## आशिष शेलार, संन्यासाची तारीख कधी जाहीर करताय सांगा ना... सुषमा अंधारे यांचं खोचक ट्विट

लोकसभा निवडणुकीचे निकाल हाती आले असून देशात पुन्हा एनडीए सत्ता स्थापन करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विजयाची हॅटट्रिक केली असली तरी भाजपला या निवडणुकीत मोठा फटका बसला आहे. उत्तर प्रदेशसह महाराष्ट्रातही भाजपची पिछेहाट झाल्याचे दिसून आले. तर आत्तपर्यंत सत्ताधारी ज्या कॉँग्रेस आणि मविआची खिल्ली उडवत होते, त्यांच्या महाराष्ट्रात ३० जागा निवडून आल्या आहेत. तर महायुतीला मात्र 17 जागांवर समाधान मानावे लागले. भाजपच्या अनेक दिग्गज नेत्यांचा राज्यात दारूण पराभव झाला. याचदरम्यान भाजप आमदार आणि मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी पूर्वी केलेले एक विधान पुन्हा चर्चेत आले आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मविआला 18 किंवा त्यापेक्षा जास्त जागा मिळाल्या तर राजकारणातून संन्यास घेईन, अशी घोषणा केली होती. त्यांच्या याच घोषणेचा दाखला देत शिवसेना उबाठा गटाकडून त्यांना डिवण्यात आलं आहे.

शिवसेना उबाठा गटाच्या फायरब्रँड नेत्या सुषमा अंधारे यांनी शेलार यांना उद्देशून एक खोचक ट्विट केलं आहे. ‘ आशिष शेलारजी संन्यासाची तारीख कधी जाहीर करताय तेवढे सांगा ना... म्हणजे तुमच्या संन्यास सोहळ्याला मला तुम्हाला भगवी कफनी, रुद्राक्षाच्या माळा, काठी , लोटी , सगळं देता येईल.. !’अशी खोचक टीका करत अंधारे यांनी शेलार यांना टोला लगावला.

## सातारकरांनी राखला गादीचा मान, उदयराजेकडून शशिकात शिंदे याचा पराभव

**सातारा प्रतिनिधी**

सातारा लोकसभा मतदारसंघा भारतीय जनता पक्षाकडून छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शशिकांत शिंदे मैदानात होते. एक्झिट पोलमध्ये उदयनराजे भोसले यांचा पराभव होईल असा दावा केला जात होता. पण तो चुकीचा ठरला. मतमोजणी सुरु झाल्यापासून दोघांमध्ये कांटे की टक्कर पाहायला मिळत होती. त्यामुळे विजय कोण होणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. आता उदयनराजे भोसले यांनी गेल्या निवडणुकीत वचपा काढला आहे. त्यांनी शशिकांत शिंदे यांचा पराभव करत विजय मिळवला आहे. अखेर साताऱ्यात उदयनराजे भोसले यांनी मुसंडी मारली आहे. सातारा लोकसभेसाठी तिकीट



मागत असताना आपण येथून विजयी होणारच असं उदयनराजे भोसले यांनी विश्वास व्यक्त केला होता. पक्षाकडून उमेदवारी मिळावी म्हणून राजेंनी दिल्लीत मुक्काम ठोकावा होता. मावळते खासदार श्रीनिवास पाटील यांनी निवडणूक लढण्यास नकार दिल्याने शरद पवार गटापुढे कोणाला उमेवारी द्यावी म्हणून संभ्रम होता. त्यानंतर त्यांनी शशिकांत शिंदे यांना उमेदवारी जाहीर केली होती. कोरेगावचे माजी आमदार शशिकांत शिंदे यांना तिकीट जाहीर झाल्यानंतर कांटे की टक्कर होईल असं कोणाला वाटलं नव्हतं. एक्झिट पोलमध्येही उदयनराजे भोसले पराभूत होईल अशीच शक्यता वर्तवली गेली होती. पण आता भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांचा विजय निश्चित झाला आहे. या हायहोल्टेज लढतीत अखेर उदयनराजे भोसले यांनी बाजी मारली आहे. साताऱ्याचा गड राखण्यात त्यांना यश मिळाले आहे. कराड दक्षिण मतदारसंघात उदयनराजे यांना अधिकच मताधिक्य मिळाले असून असुन विद्यमान लोकप्रतिनिधींनी त्याचं आत्मचिंतन करावं असं सातारा लोकसभेचे भाजपचे प्रभारी डॉ अतुल भोसले यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर टीका केली आहे.

## व्हॉट्सऑपवर विजयाचा उन्माद नको; नाहीतर कारवाईचा बडगा, ग्रुप ॲडमिनला नाहक त्रास

लोकसभा निवडणुकीसाठी मतमोजणीला सुरुवात झाली आहे. अशावेळी समर्थक आणि कार्यकर्त्यांनी सकाळपासूनच मतमोजणी केंद्राजवळ गर्दी केली आहे. कोण आघाडीवर आणि कोण पिछाडीवर आहे, याचे गणित समोर येत आहे. सोशल मीडियामुळे अवघ्या काही क्षणातच पोस्ट व्हायरल होते. अशावेळी आक्षेपार्ह्य, जातीय अथवा इतर काही वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर आल्यास ग्रुप ॲडमिनला फटक बसू शकतो. छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी अशावेळी ग्रुप ॲडमिनला सावधगिरीचा इशारा दिला आहे. त्याच्यावर थेट कारवाईचा बडगा उगारल्या जाऊ शकतो. काय आहे आदर्श आचारसंहिताछत्रपती संभाजीनगर शहर पोलीस आयुक्तालयाने नागरिकांना सोशल मीडियाचा वापर करताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरात 16 मार्च ते 6 जूनपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू आहे. 4 जून रोजी म्हणजे आज लोकसभेचा




निकाल जाहीर होईल. त्यामुळे नागरिकांनी सोशल मीडियावर पोस्ट करताना कुणाच्या भावना दुखावल्या जातील अशा पोस्ट न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्रॅम अथवा इतर कोणत्याही समाज माध्यमावर कोणताही समाज, जात, धर्माच्या भावना दुखावतील, अशा प्रकारच्या पोस्ट, बॅनर, कथा अथवा विश्लेषणाच्या आडून कुणा विशिष्ट समाजाच्या, व्यक्तीच्या भावना दुखावल्या जातील, असे कृत्य न करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. याविषयी पोलिसांनी ग्रुप ॲडमिनला सावधगिरीचा इशारा दिला आहे. अशी कोणतीही पोस्ट ग्रुपवर न येऊ देण्याची जबाबदारी त्या त्या ग्रुप ॲडमिनची असणार आहे. त्यामुळे अशी पोस्ट दाखल झाल्यास कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

## ठाकरेंच्या निष्ठावंत उमेदवाराला शिंदेंच्या म्हस्केंचा दणका, तब्बल दीड लाखांची लीड

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या बालेकिल्ल्यात आपलं वर्चस्व राखण्यात यश मिळवताना दिसत आहे. ठाणे जिल्ह्यातील ठाणे आणि कल्याण या दोन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये शिंदेंच्या उमेदवारांचा डंका दिसतोय. विशेष म्हणजे ठाण्यात मोठी उलटफेर होईल, या चर्चांमधील धूर निघाला आहे. कारण ठाकरे गटाचे विद्यमान खासदार राजन विचारे यांना मोठा धक्का मिळताना दिसतोय. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांना जवळपास दीड लाखांचं लीड मिळताना दिसत आहे. आतापर्यंत मतमोजणीबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नरेश म्हस्के यांना 5 लाख 4 हजार 177 मतं मिळाली आहेत. तर राजन विचारे यांना 3 लाख 63 हजार 220 मतं मिळाल्याची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे नरेश म्हस्के 1 लाख 40 हजार 957 मतांनी आघाडीवर आहेत.

## पराभव जिव्हारी, आमदाराचा पदाचा राजीनामा, तर रामटेकमधील कार्यकारिणीच बरखास्त; भाजपची साफसफाई सुरू

**बीड (प्रतिनिधी)**

लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव हा भाजपच्या अतिशय जिव्हारी लागला आहे. त्यामुळे भाजपमध्ये आता राजीनामा सत्र सुरु झालं आहे. स्वत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारत मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे संकेत दिले आहेत. आपल्या केंद्रीय नेतृत्वाने आपल्याला उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मोकळं करुन पक्ष संघटनेची जबाबदारी द्यावी, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या या भूमिकेनंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांना सत्तेत राहून पक्ष संघटनेसाठी काम करण्याचं आवाहन केलं आहे. दुसरीकडे भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून फडणवीसांना राजीनामा न देण्याचं आवाहन केलं जात आहे. या सर्व घडामोडींदरम्यान आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. भाजपच्या एका आमदाराने आपल्या पक्ष संघटनेच्या पदाचा राजीनामा दिला आहे. तर रामटेमध्ये पक्षाने कार्यकारिणीच बरखास्त केल्याची माहिती समोर आली आहे भाजप आमदार प्रवीण पोटे यांनी अमरावती शहर भाजप अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांचा अमरावती लोकसभा मतदारसंघात झालेल्या पराभवाची नैतिक जबाबदारी म्हणून आमदार प्रवीण पोटे यांनी शहर अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. प्रवीण पोटे यांनी भाजप प्रदेशअध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना आपला राजीनामा पाठवला आहे. प्रवीण पोटे यांनी राजीनामा दिल्याने अमरावती भाजपमध्ये खळबळ उडाली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com